# MT

Seat No. | | | | | | | |

2018 .... .... 1100

**MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - SEMI PRELIM - I - PAPER - IV**

**Time : 3 Hours** **(Pages 11)** **Max. Marks : 100**

## विभाग १ – गद्य

**प्र.१ अ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) आकृतिबंध पूर्ण करा.** **2**

**निरंजनला या प्रश्नांची उत्तरे धडाधड येत होती**

↓

| | |
|---|---|
| १ | |
| २ | |
| ३ | |
| ४ | |

मामा गेला तो पुन्हा परतला नाही मात्र लहानगा निरंजन मावशीच्या घरी प्रामाणिकपणे काम करायचा. घरातल्या सर्वांशी त्याने जमवून घेतलं आणि शाळेत नाव दाखल केलं. मावशीची परिस्थिती यथातथाच असल्याने निरंजन वार लावून जेवायचा. पहिल्याच वर्षी त्याची अभ्यासातली प्रगती पाहून भडसावळे गुरुजींनी त्याला थोरामोठ्यांच्या घरी वार लावून दिले. दररोज एकाच्या घरी दुपारी निरंजन पाहुणा म्हणून जेवायला जायचा, मग तिथून शाळेत. संध्याकाळी मात्र मावशीकडे जे काही मिळेल त्यावर राहायचा. सकाळी लवकर उठून घरातली, गोठ्यातली सारी कामं आटपून अभ्यासाला बसायचा. गुरूजींवर श्रद्धा ठेवायचा आणि परीक्षेत पहिला नंबर पटकवायचा. त्याच्या वह्या-पुस्तकांचा खर्च भडसावळे गुरुजीच करायचे. गुरुजींनी त्याला सांगितलं, की 'जोपर्यंत तुझा पहिला नंबर आहे, तोपर्यंतच मी सारा खर्च करीन आणि वारही लावून देईन. नाहीतर नाही.' गुरुजींचं हे वाक्य लक्षात ठेवून निरंजन झटून अभ्यास करायचा.

आज नागरिकशास्त्राचा अभ्यास करत असताना आधीचे सगळे पेपर्स चांगले गेले असल्याने तो मनोमन खूश होता. नागरिकांची कर्तव्य कोणती ? उत्तम नागरिक कुणाला म्हणावे ? लोकसभा म्हणजे काय ? ग्रामपंचायतीचा प्रमुख कोण असतो ? साऱ्या प्रश्नांची उत्तरे त्याला धडाधड येत होती. अभ्यास करता करता किती वेळ लोटला कुणास ठाऊक. निरंजन ताडकन उठून उभा राहिला. नऊ वाजून गेले होते. साडेदहाची परीक्षा. त्याआधी देशमुखांकडे जायचं होतं. केवढंतरी लांब चालायचं होतं. भराभर आवरून तो निघाला.

(२) **(i) योग्य पर्याय निवडा.** **1**

**भडसावळे गुरुजींनी निरंजनला वार लावून दिले.**

(i) स्वत:च्या घरी (ii) थोरामोठ्यांच्या घरी

(iii) मुख्याध्यापकांकडे (iv) मावशीकडे

**(ii) सकारण लिहा.** **1**

निरंजन आज मनोमन खूश होता कारण .....

(३) **व्याकरण :**

**(i) अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य पुन्हा लिहा.** **1**

<u>मामा</u> गेला तो पुन्हा परतला नाही.

**(ii) विरुद्धार्थी शब्द लिहा.** **1**

(i) अधोगती × ☐ (ii) अप्रामाणिक × ☐

(४) **स्वमत :** **2**

गरीब विद्यार्थी मित्राला तुम्ही केलेली मदत स्पष्ट करा.

**प्र.१ आ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **एका वाक्यात उत्तरे लिहा.** **2**

(i) लेखक कशासाठी अधीर होता?

(ii) लेखकासाठी कोणती कसरत होती?

कालच संध्याकाळी विश्रामगृहावर गप्पा मारताना टोंगेंनी मला त्या परिसरात चार पिल्लं असलेल्या वाघिणीबद्दल सांगितलं होतं. तेव्हापासूनच मला कधी तिथं जातो असं झालं होतं. प्रचंड उष्णतेचे दिवस असल्यानं वाघासारखं जनावर पाण्याच्या आसपासच वावरतं. तशातच लहान पिल्लं असल्यानं या वाघिणीला त्यांना पाण्यापासून जास्त दूर नेणंदेखील शक्य नव्हतं; पण लहान पिल्लं असणारी वाघीण ही जंगलातलं सगळ्यात धोकादायक जनावर! पिल्लांच्या संरक्षणासाठी ही सजग आई, कुणाचा जीवदेखील घ्यायला मागं-पुढं बघत नाही. त्यामुळं सुकलेल्या नाल्यात उतरताना माझ्या मनावर एक अनामिक दडपण आलं होतं.

दहा - बारा पावलंच चाललो असू. मला नाल्यातील ओलसर चिखलात मांजरापेक्षा मोठ्या आकाराची अनेक पावलं उमटलेली दिसली. मी झटकन पुढं जाऊन वाकून बघितलं. या पिल्ल्यांच्याच पाऊलखुणा होत्या. त्या पगमार्क्सकडं बघून लक्षात आलं, की ते काल रात्रीचेच आहेत. याचा अर्थ स्पष्ट होता. वाघीण अद्याप आपल्या पिल्लांसह याच परिसरात वावरत होती. आता मी ती पिल्लं बघायला चांगलाच अधीर झालो होतो. इथून सुमारे शंभर - सव्वाशे पावलांवर नाल्यात थोडंसं पाणी असल्याचं मला माहीतच होतं. ही वाघीण तिथंच सापडण्याची शक्यता होती. त्यामुळं आता तिकडं जाताना खूपच सावधगिरी बाळगणं आवश्यक होतं. जमिनीवर सर्वत्र पानगळीमुळं पडलेला वाळका पाचोळा साचून होता. त्यावरून पाय न वाजवता जाणं ही एक मोठीच कसरत होती.

पाणवठा जसा जवळ आला तसं माझं ह्वदय जोरजोरात धडधडू लागलं. पुढं काय दिसेल, या जाणिवेनंच माझा घसा कोरडा पडला. इतरांचीही अवस्था काही वेगळी नव्हती. आम्ही सगळयांनीच एकमेकांकडं बघत चौकस राहण्याची डोळयांनीच खूण करून सूचना केली. आता एकेक पाऊल टाकताना मनावरचं दडपण अधिकच वाढत होतं. कुठंतरी झाडाच्या बुंध्याआड, जांभळीच्या झुडपात लपलेली वाघीण रागानं गुरगुरत क्षणार्धात अंगावर येणार, असंच वाटत होतं. वाऱ्यानं हळूच होणारी पानांची सळसळदेखील मोठी वाटत होती. आता जणू सगळा काळच थांबला असावा, असं वाटत होतं.

(२) (i) **योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.** **1**

लहान पिल्लं असणारी वाघीण ही जंगलातलं सगळ्यात ···

(अ) उत्तम जनावर! (आ) धोकादायक जनावर!

(इ) विश्वासू प्राणी! (ई) घाबरट जनावर!

(ii) **सहसंबंध लिहा.** **1**

ओलसर : चिखल :: पानांची : .............

(३) **व्याकरण :**

(i) **काळ ओळखा.** **1**

एकेक पाऊल टाकताना मनावरचं दडपण अधिकच वाढत होतं.

(ii) **अधोरेखित शब्दाची जात ओळखा.** **1**

जमिनी<u>वर</u> सर्वत्र पानगळीमुळं पडलेला वाळका पाचोळा साचून होता.

(४) **स्वमत :** **2**

तुम्ही पाहिलेल्या सर्कशीमधील चित्तथरारक प्रसंगाचे वर्णन तुमच्या शब्दांत करा.

**अपठित गद्य**

**प्र.१ इ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **खालील कृतीचा परिणाम लिहा.** **2**

(i) मुंबईच्या स्टेशननजीक राहणारे परगावी गेले.

(ii) ट्रान्झिस्टर लावून अभ्यास करणाऱ्यांना ट्रान्झिस्टर नसला

माणूस सवयीचा गुलाम असतो हेच खरे. मुंबईच्या स्टेशननजीक राहणाऱ्यांना कुठे परगावी गेले, की आगगाड्यांच्या धडधडाटाशिवाय झोप येत नाही. इंजिनांच्या कर्कश शिट्यांनीही त्यांच्या झोपेत व्यत्यय येत नाही; पण या शिट्या नसल्या तर मात्र हे लोक वारंवार धसकून जागे होतील. नित्य टॅक्सीतून फिरणारे एक गृहस्थ काल म्हणत होते की,काय करावे समजत नाही. टॅक्सीचे तर दर

वाढल्यामुळे यापुढे परवडण्याजोगी नाही आणि बसच्या रांगेत ताटकळण्याची कधी सवय नाही. ते नकोसे वाटते, उबग येतो. आपली सरळ एक टॅक्सी करावी आणि कुठे ते जावे, असे सहजी वाटते, पण दर वाढलेले! गेले दोन-तीन दिवस अक्षरश: पोरक्यासारखे ते रस्त्याने फिरतात. एवढ्याही आवाजाने मनाची एकाग्रता भंगणारे कुणी असतील, तसे सवयीने कानाशी ट्रान्झिस्टर लावून एकचित्तपणे अभ्यास करणारेही आढळतात. ट्रान्झिस्टर नसला तर त्यांचा अभ्यास व्हायचा नाही.

मुंबईतली एक जुनी इमारत दोन वर्षांमागे पडली. त्यात वाचलेले एक गृहस्थ सध्या मानसिक रुग्ण म्हणून परळच्या इस्पितळात आहेत.येत्या-जात्या वाहनाने हादरून झुलणाऱ्या इमारतीच्या झुल्यावर रोज रात्री गाढ झोपण्याची त्यांची अनेक वर्षांची सवय; पक्क्या घरात त्यांना निद्रानाश जडला. आता याला सवय नाही तर काय म्हणावे, तुम्हीच सांगा.

(२) (i) **सहसंबंध लिहा.** **1**

आगगाड्यांचा : धडधडाट :: इंजिनांच्या : .........

(ii) **एका वाक्यात उत्तर लिहा.** **1**

माणूस कशाचा गुलाम असतो ?

(३) **व्याकरण :**

**सूचनेनुसार सोडवा.** **2**

(i) मुंबईतील जुनी इमारत दोन वर्षांपूर्वी पडली. (काळ ओळखा)

(ii) इंजिनांच्या कर्कश शिट्यांनीही त्यांच्या झोपेत व्यत्यय येत नाही. (शब्दाची जात ओळखा)

(४) **स्वमत :** **2**

**माणसाने सवयीचे गुलाम असावे का नसावे तुमचे विचार मांडा.**

## विभाग २ – पद्य

**प्र.२ अ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **चौकट पूर्ण करा.** **2**

(i) फुलामुलांतून हसणारा - [ ]

(ii) मातीचे मंगल - [ ]

(iii) चैतन्याचे - [ ]

(iv) अपरंपार धन - [ ]

| |
|---|
| या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार<br>नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार।।<br><br>फुलामुलांतून हसतो श्रावण<br>मातीचे हो मंगल तनमन<br>चैतन्याचे फिरे सुदर्शन<br>शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार।।<br><br>या हातांनी यंत्र डोलते<br>श्रमशक्तीचे मंत्र बोलते<br>उद्योगाचे चक्र चालते<br>आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार।।<br><br>हजार आम्ही एकी बळकट<br>सर्वांचे हो एकच मनगट<br>शक्तीचीही झडते नौबत<br>घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार।।<br><br>या विश्वाची विभव संपदा<br>जपू वाढवू आम्ही लाखदा<br>हस्त शुभंकर हवा एकदा<br>भविष्य उज्ज्वल या देशाचे करूया जयजयकार।। |

(२) **(i) कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** **1**

शक्तीचीही झडते ........... (दौलत, नौबत, धनदौलत, पत)

**(ii) एका वाक्यात उत्तर लिहा.** **1**

कवी उत्क्रांतीचा ललकार कोठे घुमवायला सांगतात?

(३) **खालील काव्यपंक्तीतून सूचित होणारा अर्थ लिहा.** **2**

घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार ।

(४) **या कवितेत कवीने बघितलेले स्वप्न तुमच्या शब्दांत लिहा.** **2**

**प्र.२ आ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **चौकटी पूर्ण करा.** **2**

(i) फुटते शरीरभर पालवी याचा अर्थ – [ ]

(ii) अलगद उतरणारे थेंब – [ ]

(iii) कवीच्या मते उत्साही आयुष्य म्हणजे – [ ]

(iv) पानझडीनंतरचे, नवी वस्त्रे धारण करणारे झाड म्हणजे – [ ]

झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत
धारण करून तपश्चर्या करत...
पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं
मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट सहन करते
झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब
झाडाकडे टक लावून पाहिलं तर
शरीरभर विरघळतो हिरवा रंग
रक्त होते क्षणभर हिरवेगार
आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत
झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिरांना कवेत घेण्यासाठी
पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं
नव्या नवरीसारखं
झाडाला पालवी फुटल्यावर फुटते शरीरभर पालवी
अन झटकली जाते मरगळ
पक्ष्यांच्या मंजुळ नादात झाडाचंही जीवनाचं
एक संथ गाणे दडलेले असते
हसावं कसं सळसळत्या पानासारखं
मुळावं मुरावं कसं तर ? झाडासारखं घट्ट पाय रोवीत
जगावं कसं तर ? हिरवंगार झाडासारखं
रोजचं चिंतन करावं कसं तर झाडासारखं!

(२) **आकृतिबंध पूर्ण करा.** **2**




(३) **पुढील ओळींचे अर्थसौंदर्य स्पष्ट करा.** **2**

'पक्षी झाडांचे कुणीच नसतात तरीही झाडं त्यांचं असतं'

(४) **झाडाचे मानवी जीवनातील महत्त्वाचे स्थान याचा तुम्हाला कळलेला अर्थ स्पष्ट करा.** **2**

**प्र.२ इ. खालील ओळींचे रसग्रहण करा.** **4**

(१) वर घोंघावे बंबारा, पुढे कल्लोळ धुराचे
धडाडत्या तोफांतून तुझें पाऊल जिद्दीचे;

## विभाग ३ – स्थूलवाचन

**प्र.३. खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.** **6**

(१) वाळवंटी प्रदेशातील झाडांना काटे असण्याची कोणकोणती कारणे असावीत, असे तुम्हांला वाटते ते लिहा.

(२) 'पाणी हेच जीवन!' या विधानासंबंधी तुमचे विचार लिहा.

(३) खालील मुद्द्यांवर एक परिच्छेद तयार करा. (७ ते ८ वाक्यांत)

व्युत्पत्ती कोश
- → निर्मितीचा ठराव
- → निर्मितीची जबाबदारी
- → निर्मितीसाठी अर्थसाहाय्य
- → त्याचे प्रकाशन

## विभाग ४ – भाषाभ्यास

**प्र.४ (अ) भाषाभ्यासावर आधारित कृती**

(i) **समास** **2**

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | बरेवाईट | --------------- | --------------- |
| (ii) | कृष्णार्जुन | --------------- | --------------- |

(ii) **अलंकार** **2**

खालील ओळीतील उपमेय, उपमान, साम्यवाचक शब्द व समान धर्म (गुण) असे वर्गीकरण करा.

हा आंबा साखरेसारखा गोड आहे.

| उपमेय | उपमान | साम्यवाचक शब्द | समान धर्म |
|---|---|---|---|
| --------- | --------- | --------- | --------- |

(iii) **वाक्यरूपांतर** **2**

**कंसातील सूचनेप्रमाणे वाक्य परिवर्तन करून लिहा.**

१. स्टेशन इथून खूप दूर होतं. (नकारार्थी करा.)

२. तहान शमवण्यासाठी हे पाणी पीत. (आज्ञार्थी करा.)

(iv) **सामान्यरूप** **2**

**कंसात दिलेल्या शब्दांचे सामान्यरूप करून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. (तो) ने यशाचे शिखर गाठले.

२. अन्यायविरुद्ध (मी) ला चीड येते.

(v) **वाक्प्रचार** **2**

**खालील वाक्प्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(आनंद गगनात न मावणे, हेवा वाटणे, नाव उज्ज्वल करणे)

१. अचानक दारात मामा मामींना बघून सर्वांना खूप आनंद झाला.

२. कौस्तुभने बुद्धिबळ खेळात शाळेचे नाव उंचावले.

**प्र.४ (ब) स्वाध्यायावर आधारित कृती.**

**(१) शब्दसंपत्ती** **1**

(i) **समानार्थी शब्द लिहा.**

१. झपाझप - ............ २. सूक्ष्म - ............

(ii) **विरुद्धार्थी शब्द लिहा.** **1**

१. कळत × ☐ २. वाकडे × ☐

(iii) **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.** **1**

दुसऱ्याच्या मनातले ओळखणारा - ☐

(iv) **एका शब्दाचे भिन्न अर्थ लिहा.** **1**

☐ ← चपला → ☐

**(२) लेखननियमांनुसार लेखन**

(i) **अचूक शब्द ओळखून लिहा.** **1**

१. व्यंगचित्र, वेंगचित्र, व्यंगचित्र, व्यंगचीत्र

२. स्मृतीदिन, स्मृतीदीन, स्मृतिदिन, स्मृतिदीन

(ii) **खालील वाक्ये लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.** **1**

अभीषेक-स्नेहलचे बाबाही तयार होवून हॉलमध्ये आले.

**(३) विरामचिन्हे**

**खालील वाक्यातील विरामचिन्हे शोधून त्यांची नावे लिहा.** **2**

''मावशी तुम्ही राहता कुठं ?''

| विरामचिन्हे | नावे |
|---|---|
| --------- | --------- |
| --------- | --------- |

(४) **पारिभाषिक शब्द**

**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.** **1**

१. Zone - २. Courtyard -

(५) **भाषिक खेळ**

**खालील शब्द अकारविल्हेनुसार लावा.** **1**

आकार, उकार, मकार, इकार

**विभाग ५ – उपयोजित लेखन**

**प्र.५ अ. खालील कृती सोडवा.**

(१) **पत्रलेखन** **5**

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

'झाडे लावा... झाडे जगवा'

**दिनांक ५ जून**

**हिरवाई ट्रस्ट, तळेगांव दाभाडे**

**जागतिक पर्यावरण दिनानिमित्त**

**रोपांचे मोफत वाटप**

**संपर्क - हिरवाई ट्रस्ट, बालोद्यान मार्ग, तळेगांव दाभाडे**

**विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने**

- शाळेत वृक्षारोपण करण्यासाठी रोपांची मागणी करणारे पत्र लिहा.
- चांगला उपक्रमाबाबत हिरवाई ट्रस्टचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

(२) **सारांश लेखन** **5**

**खालील उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

समाजाला खळखळून हसवणारे घटक कोणते, याचा विचार करू लागलो तर आपल्यासमोर तीन नावे पटकन येतात-एक विदूषक, दुसरा सोंगाड्या आणि तिसरा हा बहुरूपी. संस्कृत नाटकाच्या अस्ताबरोबरच विदूषक लोप पावला. बदल झालेल्या स्वरूपात तो असलाच तर फक्त राजेरजवाड्यांपुरताच असावा. तमाशातला सोंगाड्या याच्या विनोदाची जात व प्रत वेगळी. शिवाय तो आपल्या अंगणात येऊन हसविणारा नाही. राहता राहिला बहुरूप्याचा विनोद. त्याचा विनोद हा ताज्या खोबऱ्याच्या चवीसारखा. असंभाव्यता, अतिशयोक्ती, कोटिक्रम, अभिनय आणि लयबद्धता यांमुळे तो निकोप व तितकाच खळखळून हसविणारा असा असतो. त्यासाठी प्रेक्षकाला खास कसली तयारी करावी लागत नाही, हे एक वैशिष्ट्य आहे, कीर्तन, प्रवचन, भजन, तमाशा व पोथीवाचन यांतून खेड्यांतील मंडळींची करमणूक अन् उद्बोधन होत असले तरी त्याला काही मर्यादा आहेत.

**प्र.५ आ. खालील कृती सोडवा.**

**(१) जाहिरात लेखन** **6**

**खालील शब्दांचा आधार घेऊन आकर्षक जाहिरात तयार करा :**

कूल - कूल
माफक दर
ठंडा, ठंडा
आईसक्रीम पार्लर
दरपत्रक
आस्वाद

**(२) कथा लेखन** **6**

**खाली दिलेल्या मुद्द्यांवरून कथा तयार करा.**

मुद्दे : माहेरी आलेली मुलगी – आईवडिलांकडून गरिबीबद्दल अपमान – माहेरी न येण्याचा निश्चय – बारा वर्षांनंतर भावाचे बहिणीकडे जाणे – तिचा सुखी संसार – भावाला पश्चाताप.

**प्र.५ इ. लेखनकौशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **8**

**(१) मी राष्ट्रध्वज बोलतोय**

१. प्रस्तावना
२. राष्ट्रध्वज देशाची ओळख
३. अस्तित्वाचे प्रतिक ध्वजाचे स्वरूप



४. राष्ट्रध्वजाचा गौरवशाली इतिहास
५. प्रतित अर्थ - त्याग, बलिदान, देशभक्तीची भावना
६. सध्याची स्थिती - दु:ख

(२)




**वरील प्रसंगी तुम्ही उपस्थित होता. त्या प्रसंगाचे वर्णन करा.**

**Best Of Luck**